# एका आईचा अभिमान

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

असा कोणता दिवस आहे की,
जेव्हा आईचे गुणगान केले जात नाही?

जन्माला येणार असलेल्या प्रत्येक शिशूच्या आत्म्याने
त्याच्या चिरंतन प्रवासात या ब्रह्मांडात विहार करत,
चितीच्या अंतरिक्षात तरंगत,
या ना त्या प्रकारे,
या अद्‌भुत पृथ्वी ग्रहाविषयी जाणून घेतले आहे.

*पृथ्वी.*

जिथे सुरक्षितपणे जन्म घेता येईल अशा
आश्रयस्थानाचा शोध घेत असताना
तो आत्मा किती आसुसलेला असावा.

या ग्रहावरील एक प्रेमळ हृदय,
त्या आत्म्याची अपेक्षा करत असो किंवा नसो,

कामना करत असो किंवा नसो,

ते हृदय स्वतःच्या अस्तित्वात त्या आत्म्याचे स्वागत करते.

निर्णयाचा तो क्षण बनतो

कठोर परिश्रमाचे,

अतीव यातनांचे

आणि हर्षाने पूरित असलेले आयुष्य.

तो बनतो एक कृतकृत्य भाग्य.

*भाग्य.*

एका आईला अनुभवास येणारे

आनंदाचे शिखर

किंवा तिच्या अथांग व्यथा

कोणालाही, कधीही पूर्णपणे कळणार नाहीत,

मग तिच्या त्या भावनांची सळसळ ऐकू येत असो

किंवा त्या भावना तिच्या मनाच्या खोलवरील अंधाऱ्या अरण्यात कुजबुजत असोत.

पण एक गोष्ट निश्चित आहे :

एका आईच्या हृदयाचे

एकच उद्दिष्ट असते,

त्याची एकच धडपड असते –

या ब्रह्मांडात जे सर्वश्रेष्ठ आहे ते तिच्या बाळाला मिळावे

याचे आवाहन करणे.

एक आई जिला

तिच्या काळजाचा तुकडा स्वाधीन केला गेला आहे,

ती संघर्ष करत राहते,

आपल्या बाळासाठी जितके सर्वश्रेष्ठ बनता येईल,

तितके सर्वश्रेष्ठ बनण्यासाठी.

काहीही होवो,

ती अतिशय अभिमानाने

रात्रंदिवस आपल्या बाळाची

स्वप्ने साकार करण्यासाठी झटत राहते.

*बाराही महिने, चोवीस तास.*

तिचे मूल जेव्हा दुःखी असते, तेव्हा एक आई अश्रू ढाळते.

जेव्हा तिचे मूल आनंदी असते, तेव्हा तिच्या चेहऱ्यावर हास्य विलसते.

*माझ्या बाळाला काय करावेसे वाटते?*

एका आईचा पहिला विचार असाच असतो.

तिच्या प्रेरणा आणि कामना

सदैव थेट तिच्या हृदयातून येतात —

तिच्या उत्कृष्ट, विशाल हृदयातून.

*पहिला विचार:*

असे होऊ शकते की, कधीकधी आईच्या नकळत

तिचे बालक तिच्यावर प्रेमाचा वर्षाव करेल.

तर कधीकधी असे होऊ शकते की, बालकाच्याही नकळत,

त्याचे शब्द आणि कृती असे दर्शवतील की,

जणू ते आपल्या आईचा तिरस्कार करते आहे.

तरीदेखील, एक आई पर्वतासम भक्कम असते.

एक आई नदीसम सखोल असते.

एका आईचे हृदय या ब्रह्मांडासमान आणि

त्यातून उदयास येणाऱ्या ग्रहांसमान व आकाशगंगांसमान विस्तीर्ण असते.

आपल्या कर्तव्याप्रति असलेली तिची निष्ठा,

ही तिच्या बालकाच्या मनोभावांच्या किंवा कृतींच्या

लाटांबरोबर हेलकावे घेत नाही.

तिचे मूल तिला देव्हाऱ्यात बसवो

किंवा तिने अदृश्य व्हावे अशी इच्छा बाळगो —

एका आईचे कार्य अविरतपणे सुरूच राहते.

अव्यक्त नैराश्यातूनही एक आई आपला मार्ग शोधून पुढे जात राहील.

ती अगणित अपमानास्पद शेरे सहन करेल,

असंख्य अनपेक्षित वादळांना सामोरे जाईल,

अलौकिक शक्तीनिशी,

दिमाखाने आणि समस्थितीसह.

का?

कशी?

कारण ती प्रेमाने बनली आहे.

*प्रेम.*

प्रेम सर्वकाही धारण करते

आणि आई ही प्रेमाचे मूर्तिमंत प्रतीक आहे.

वर्षातून एकदा आईला 'मातृदिनाच्या शुभेच्छा' देणे

हे खरेतर, आई जे काही करते त्याच्या महत्तेचे मोजमाप

करूच शकत नाही,

पण मग कुठलीच गोष्ट,

तिने केलेल्या प्रचंड त्यागाची

किंवा तिच्या प्रेमळ आणि निःस्वार्थ हृदयाच्या विशालतेची

बरोबरी कधीही करू शकणार नाही.

तरीदेखील,

तिला सुखद मातृदिनाच्या शुभेच्छा देण्याचा

एक अल्पसा प्रयत्नसुद्धा

तिच्या चेहऱ्यावर निखळ हसू आणेल.

तिच्यासाठी,

त्या शुभेच्छा सर्व अनमोल हिरेमाणकांपेक्षा,

समस्त ज्ञानप्राप्तींपेक्षाही,

आणि या जगातील सगळ्या यश-सन्मानापेक्षाही बहुमोल असतात.

एक छोटासा नजराणा त्यांच्याकडून,

ज्यांच्यावर तिचे प्रेम आहे आणि ज्यांचा ती आदर करते,

जे तिच्या माधुर्याने आणि दयाळूपणाने धन्य झाले आहेत,

ज्यांना तिने सर्वकाही दिले आहे —

तो छोटासा नजराणा

एका आईच्या हातात आल्याने

वृद्धिंगत होऊन सहस्त्रावधी सूर्यांच्या ऊर्जेसम बनेल.

आणि ती एक आई आहे म्हणून,

स्वाभाविकपणे आपली ऊर्जा भूमातेला देईल.

ती शक्ति-सामर्थ्य प्रदान करेल

या पृथ्वीवरील अनेक लोकलोकांतरांना,

जे तिच्या बाळांना कवेत घेतात

आणि त्या अनेक लोकलोकांतरांसुद्धा जे तिच्या बालकांच्या अंतरी

आकार घेतात व लय पावतात.

एक आई असते

काळजी घेणारी,

लालनपालन करणारी,

दिलासा देणारी,

सांत्वन करणारी.

एक आई असते

शिक्षिका,

प्रशिक्षिका,

संरक्षक,

मार्गदर्शिका.

एक आई ती असते

जिचे कान ऐकण्यासाठी सदैव तत्पर आणि ग्रहणशील असतात,

जिचा हात स्थिर आणि विश्वसनीय असतो.

ती हिऱ्यासम चमक असलेली शिला असते.

*आई* ही उपाधी

केवळ त्यांच्यापुरतीच मर्यादित नाही ज्या जन्म देतात.

या जगाच्या कानाकोपऱ्यांत

आणि समस्त जीव-योनींमध्ये

असे अनेक उदार प्राणी आहेत

ज्यांचा मूळ स्वभावच, सहजप्रवृत्तीच आहे,

त्या अनेक भूमिका धारण करण्याची ज्या एका आईच्या भूमिका असतात.

ही सौंदर्यपूर्ण आणि हृदयस्पर्शी घटना

पुन्हापुन्हा उलगडत राहते

आणि या पृथ्विमातेला आधार देते.

म्हणून मातांना समर्पित असलेल्या या दिवशी,

त्यांचे महिमागान करा ज्या एका अन्य जीवाला जीवन देतात

आणि त्याचे लालनपालन करतात.

त्यांचा सन्मान करा जे स्वतःचा देह त्यांच्याखातर समर्पित करतात

ज्यांना एखाद्या अन्य जीवाची देखभाल करण्याची तीव्र उत्कंठा असते.

त्यांचा आदर करा,

जे एखाद्या अन्य जीवाच्या विकासासाठी आणि सुखासाठी

पुढाकार घेतात आणि स्वतःला वाहून घेतात.

हे आई भगवती, आम्हाला सदैव तुझ्या हृदयात ठेव.

Mater beneficium nostrum es.

हे मातः! त्वयोक्ते शब्दे शब्दे वयं पश्येम भगवतः प्रकाशम्।

**एक आई असते**

अनोखी

beispiellos

卓越している

ineguagliabile

**एक आई असते**

ವಿಸ್ಮಯವಾದ

excepcional

અજોડ

несравненная

**एक आई असते**

sans pareille

unübertroffen

**बेमिसाल**

唯一

**एक आई असते**

niezrównana

舉世無雙

incomparável

वरेण्य

**एक आई असते**

अद्वितीय!

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.